महाविद्यालयातील विविध विभागांकरिता आणि विषय शिक्षकांकरिता पान नं.२ वर व विद्यार्थ्यांकरिता पान नं. ३ वर निकालासंदर्भात काही सूचना दिलेल्या आहेत. सदरच्या सूचनांचे महाविद्यालयातील अभ्यास मंडळ अध्यक्ष तथा विभागप्रमुख, विषय शिक्षक व विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे.

**महाविद्यालयातील प्रवेश विभाग, पात्रता विभाग आणि महाविद्यालयातील विभागप्रमुख, विषय शिक्षकांकरिता सूचना**

१. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर निकाल घोषित झाल्या नंतर महाविद्यालयातील विविध विभागांनी घोषित झालेल्या निकालाच्या पॅटर्नमधील सर्व विद्यार्थ्यांचे निकाल घोषित झाले आहेत का याची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

२. ज्या पॅटर्नचे निकाल घोषित झाले नसतील अशा विद्यार्थ्यांची माहिती विभागप्रमुखांनी एकत्रित करून त्याची एक यादी बनवून सदरची माहिती निकाल घोषित झाल्यापासून पुढील ७ दिवसात महाविद्यालयाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळास लेखी स्वरुपात कळविणे अनिवार्य आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण असेल अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांना अदा करण्यात येणार नाहीत. विद्यार्थ्यांची पात्रता पूर्ण झाल्या नंतर व त्याप्रमाणे पात्रता विभागाकडून तशी माहिती अपडेट झाल्यानंतरच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका देण्यात येतील.(याबाबतची माहिती महाविद्यालयाच्या पात्रता विभागाने महाविद्यालयाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळास कळवावी. एखाद्या विद्यार्थ्याची पात्रता अपूर्ण असल्यास ती जेव्हा पूर्ण होईल तेव्हा परीक्षा व मूल्यमापन मंडळास कळवावी)

४. घोषित झालेल्या निकालामध्ये आपल्या विभागातील ज्या विद्यार्थ्यांचे निकाल RR/ABS/Copy Case आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना याबाबत सूचना देण्याकरिता विषय शिक्षकांनी आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांसाठी परिपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

५. घोषित झालेल्या निकालामध्ये RR/ABS/ याबद्दल असलेल्या त्रुटी बाबतचे अर्ज विद्यार्थ्यांचे निकाल घोषित झाले पासून पुढील ७ दिवसापर्यंत महाविद्यालयामध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडे जमा करावे. सर्व अर्ज एकत्रित करून त्याचा Excel Sheet मध्ये तक्ता बनवून प्राचार्याच्या स्वाक्षरीसह परीक्षा विभागातील संबंधित लिपिकाने जमा करून संलग्नित विद्यापीठाच्या नियमानुसारयोग्य ती कार्यवाही करावी. (विद्यार्थ्यांच्या अर्जावर पुढील माहिती विद्यार्थ्यांनी भरणे अत्यंत आवश्यक आहे. Seat No. (Pattern wise), PRN No., Branch, Year & Actual Problem in Result (Subject wise or Total) ही सगळी माहिती भरली असल्याचे व सोबत त्याबाबतचे हॉल तिकीट, लेजर यांची छायांकित प्रत अर्जासोबत जोडली आहे या सर्व गोष्टीं संबंधित लिपिकाने तपासूनच अर्जावर पुढील कार्यवाही करावी. अर्जावर माहिती अपूर्ण असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

६. प्रचलित नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या निकालातील (Ordinance/ATKT/Subject Title/Subject Head/ Min, Max Passing इ.) बाबी चेक करणे आवश्यक असून यामध्ये काही त्रुटी अथवा दुरस्ती असल्यास महाविद्यालयाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निदर्शनास तात्काळ आणून घ्याव्यात.

७. जे विद्यार्थी दोन वेगवेगळया पॅटर्न मध्ये प्रवेशित आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे जुन्या पॅटर्नचे निकाल तपासून व त्याबद्दल खात्री करून घेऊनच महाविद्यालयाच्या प्रवेश विभागाने आणि पात्रता विभागाने अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा.

## विद्यार्थ्यांना सूचना

१. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर निकाल घोषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांने आपला निकाल संबंधीत पॅटर्नमध्ये घोषित झाला आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. संबंधीत पॅटर्न मध्ये प्रवेशीत असून त्या पॅटर्नच्या लेजरमध्ये आपला निकाल घोषित झालेला नाही असे निदर्शनास आल्यास विद्यार्थ्याने निकाल घोषित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत महाविद्यालयामध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळ येथे या संदर्भात अर्ज देणे अत्यंत आवश्यक आहे.

२. ज्या विद्यार्थ्यांची Copy Case असेल अशा विद्यार्थ्यांचे निकाल हे परीक्षा प्रमाद समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर घोषित करण्यात येतील.

३. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल संकेतस्थळावर घोषित झालेले आहेत परंतु त्यामध्ये काही त्रुटी असतील उदा. RR/ABS/EHB अशा विद्यार्थ्यांनी निकालामध्ये त्रुटी असल्याबद्दलचा अर्ज निकाल घोषित झाल्यापासून पुढील ७ दिवसाच्या आत महाविद्यालयामध्ये परीक्षा व मूल्यमापन मंडळ येथे जमा करणे आवश्यक (विद्यार्थ्यानी अर्ज महाविद्यालयामध्येच परीक्षा व मूल्यमापन मंडळ येथे जमा करणे अनिवार्य आहे.)

४. अर्जावर विद्यार्थ्यानी Seat No. (Pattern wise), PRN No., Branch, Year & Actual Problem in Result (Subject wise or Total) यांचा उल्लेख करणे व त्याबाबतचे हॉलतिकीट, लेजर यांची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे (विद्यार्थ्याच्या अर्जावरील माहिती अपूर्ण असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

५. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये निकालाच्या त्रुटीबाबत अर्ज दिल्यानंतर संबंधीत अर्जावर कार्यवाहीबाबत महाविद्यालयाकडे १५ दिवसानंतर विचारणा करावी.

६. निकाल घोषित झाल्यापासून पुढील ७ दिवसात निकालासंदर्भातील त्रुटीबाबत विद्यार्थ्यांने अर्ज न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल.

७. ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण असेल अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांची पात्रता महाविद्यालय / डिटीई यांच्याकडून पात्रता विभागाकडे जमा झाल्यानंतर देण्यात येतील.

८. संकेतस्थळावर निकाल घोषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निकाल घोषित झाल्यापासून पुढील पंधरा दिवसाच्या आत उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीकरिता (Photocopy Application) अर्ज जमा करणे आवश्यक आहे, त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासोबत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर घोषित झालेल्या निकालाची (लेजरकॉपीची) प्रत जोडणे आवश्यक आहे. फक्त ऑफलाईन परीक्षेच्याबाबत ही सुविधा दिली जाईल. ऑनलाईन परीक्षेसंदर्भात ही फेरतपासणीची सुविधा उपलब्ध नसेल.